# H.P.T. ARTS & R.Y.K. SCIENCE COLLEGE
&
## SCIENCE FORUM, NASHIK
organize
## Learning Through Hands-on-Activity

Ref. 294/2022-23

दिनांक: 11 जून 2022

माननीय मुख्याध्यापक/ मुख्याध्यापिका,

मागील वीस वर्षांपासून एच.पी.टी. आर्ट्स अँड आर.वाय.के. सायन्स कॉलेज व सायन्स फोरम, नासिक शालेय विद्यार्थ्यांकरता विविध उपक्रम राबवत आहे. या उपक्रमाअंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची फिरती विज्ञान प्रयोग शाळा नुकतीच नाशिकला येऊन गेली. नाशिक परिसर व आदिवासी भागातील 44 शाळांमधून 20 हजार विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला. पुणे विद्यापीठाने, फिरती प्रयोगशाळा शालेय विद्यार्थ्यांना विज्ञानची गोडी निर्माण व्हावी, त्यांच्यात विचार करण्याची क्षमता वाढीस लागावी, त्यांच्यातील सुप्त शक्ती जागृत व्हावी आणि त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोनाचे बीजारोपण व्हावे अशा विविध हेतूंनी सुरु केलेली आहे. याचे सातत्य राहण्याकरता, आपण, **"शिकूया प्रयोगातून विज्ञान" ("Learning through Hands-on-Activity")** उपक्रम सुरु करत आहोत.

या उपक्रमाअंतर्गत, विज्ञानातील काही संकल्पना (Concept) घेऊन त्यासंदर्भात विविध प्रयोग आपल्या शाळेत करून दाखवले जातील. त्यातील काही व्हिडिओ-क्लिप व व्हिडिओ-लिंक सायन्स फोरमच्या वेबसाईटवर https://nashik.com/science-forum-nashik/ आहेत. विद्यार्थ्यांनी व्हिडिओ बघावेत व त्यांच्या अभ्यासक्रमातील अथवा विज्ञानातील काही संकल्पना घेऊन व्हिडिओ तयार केल्यास, उत्तम व्हिडिओला सायन्स फोरम व कॉलेज तर्फे प्रशस्तीपत्र/पारितोषिक दिले जाईल. तसेच, त्यातील काही व्हिडिओ सायन्स फोरमच्या वेबसाईटवर विद्यार्थ्यांच्या नावासह देता येईल.

**"शिकूया प्रयोगातून विज्ञान"** या उपक्रमास, आपल्या वेळेनुसार, विद्यार्थी तसेच शिक्षकांसोबत संवाद साधण्याची परवानगी मिळावी, ही विनंती.

आपले,

डॉ. पी. पी. जोशी,
**समन्वयक, सायन्स फोरम, नासिक**
मोबाईल नंबर: 94239 68110

H.P.T. ARTS & R.Y.K. SCIENCE COLLEGE NASHIK 422 005

डॉ. व्ही. एन. सूर्यवंशी,
प्राचार्य
**PRINCIPAL**
H.P.T. Arts / R.Y.K. Sc. College
Nasik - 5.